# मान्य करा अथवा सोडा...
# अमेरिकेच्या ‘त्या’ १०० देशांच्या यादीत भारतही

**नवी दिल्ली–**अमेरिकेने एक मोठा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्टपासून जवळपास १०० देशातून येणाऱ्या वस्तूंवर १०% टॅरिफ (कर) लावणार आहे. यामुळे जागतिक व्यापारात मोठा बदल होणार आहे. अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेन्ट यांनी हे निश्चित केले आहे. बेसेन्ट म्हणाले, जे देश अमेरिकेशी चर्चा करत आहेत, त्यांच्यावर सुद्धा हा टॅरिफ लागेल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १२ देशांना पत्र पाठवले आहे. या पत्रांमध्ये नवीन टॅरिफबद्दल माहिती दिली आहे. हे एकप्रकारे मान्य करा किंवा सोडा असा प्रस्ताव आहे. अमेरिकेला त्यांच्या निर्यातीसाठी चांगल्या सवलती मिळवायच्या आहेत, म्हणून हा निर्णय घेतला आहे.

भारतासाठी हे महत्त्वाचे वृत्त आहे. कारण, भारतीय वस्तूंवर २६% टॅरिफची सवलत मिळत होती, ती ९ जुलैला संपत आहे. जर तोपर्यंत काही तोडगा निघाला नाही, तर १ ऑगस्टपासून भारताच्या निर्यातीवर जास्त कर लागेल. अमेरिकेचे अधिकारी म्हणतात की, हा जागतिक व्यापार धोरणातील मोठा बदल आहे. बेसेन्ट यांनी मब्लूमबर्ग टेलिव्हिजनफ्ला सांगितले की, जे देश वाटाघाटी करत आहेत, त्यांच्यावरही हा टॅरिफ लागेल. बेसेन्ट पुढे म्हणाले, आम्ही बघू की, जे देश बोलणी करत आहेत, त्यांच्याशी राष्ट्राध्यक्ष कसे वागतात. ते प्रामाणिकपणे बोलणी करत आहेत की नाही. जवळपास १०० देशांवर कमीत कमी १०% टॅरिफ लागेल, असे त्यांनी सांगितले.

**जगातील निम्म्या देशांना फटका बसणार**

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी १२ देशांना पत्र पाठवून टॅरिफबद्दल माहिती दिली आहे. त्यांनी या पत्रात मान्य करा अथवा सोडून द्या असा प्रस्ताव ठेवला आहे. म्हणजे, ठरलेल्या शर्ती मान्य करा, नाहीतर व्यापार सोडा. त्यांनी देशांची नावे उघड केली नाहीत, पण त्यात भारत , जपान आणि युरोपियन युनियनमधील सदस्य असण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या मते, या टॅरिफमुळे अमेरिकन वस्तूंना बाहेरच्या देशात व्यापार करण्यासाठी चांगल्या संधी मिळतील. पण, हे धोरण खूप मोठ्या स्तरावर आहे. जगातील जवळपास निम्म्या देशांना याचा फटका बसणार आहे. त्यामुळे याला सर्वात मोठा व्यापार बदल मानला जात आहे.

**भारतासाठी परिस्थिती थोडी गंभीर**

अमेरिकेने भारतीय वस्तूंवर २६% टॅरिफची सूट दिली होती, जी ९ जुलैला संपत आहे. जर तोपर्यंत काही तोडगा निघाला नाही, तर १ ऑगस्टपासून भारतीय निर्यातीवर जास्त कर भरावा लागेल.गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे . भारतीय अधिकारी वाटाघाटी करण्यासाठी वाशिंगटनला जाऊन आले. पण, अजूनपर्यंत कोणताही करार झालेला नाही. मुख्य अडचण ही आहे की, अमेरिका भारतावर दबाव टाकत आहे की, त्यांनी त्यांचे शेती आणि दुग्ध उत्पादन क्षेत्र अमेरिकी उत्पादनांसाठी खुले करावे. भारताने त्यांच्या शेतकऱ्यांना जेनेटिकली मॉडिफाइड (ऋच्) बियाणे आणि उत्पादने वापरण्याची परवानगी द्यावी.

भारताला वाटते की, अमेरिकेने भारतातील कापड, चामड्याच्या वस्तू आणि रत्ने यांसारख्या वस्तूंना अमेरिकेत जास्त संधी द्यावी. अमेरिकेने अजूनपर्यंत कोणत्याच देशाला स्टील टॅरिफमध्ये सूट दिलेली नाही, आणि त्यात भारत पण सामील आहे.

# जनतेला सन्मार्गाने चालण्याची सद्‌बुद्धी मिळावी

## मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**पुणे (प्रतिनिधी)–** आषाढी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सपत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. शासकीय महापूजेचा पवित्र मान यंदा नाशिक जिल्ह्यातील कैलास उगले आणि त्यांच्या पत्नी कल्पना उगले यांना मुख्यमंत्र्यांसमवेत लाभला. फडणवीस यांनी पांडुरंगाला महाराष्ट्रावरील सर्व संकटे दूर करण्याची शक्ती मिळावी आणि राज्यातील जनतेला सन्मार्गाने चालण्याची सद्‌बुद्धी मिळावी, असे साकडे घातले. आषाढी एकादशीनिमित्त रविवारी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे वारकऱ्यांचा आणि भाविकांचा अलोट जनसागर उसळला होता. संपूर्ण नगरी वैष्णवांच्या मेळ्याने फुलून गेली होती. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी देशभरातून लाखो भाविकांनी गर्दी केली होती. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि अभंगाच्या तालावर वारकरी तल्लीन झाले होते.

आपल्या प्रार्थनेत मुख्यमंत्र्यांनी बळीराजा आणि संपूर्ण समाज सुखी व समाधानी व्हावा, अशीही कामना व्यक्त केली. पूजेच्या संकल्पामध्ये मुख्यमंत्र्यांनी सर्व प्राणीमात्रांचे कल्याण व्हावे, महाराष्ट्रातील जनता सर्व त्रासातून मुक्त व्हावी आणि राज्य सुखाचे, समृद्धीचे, मांगल्याचे राहावे, असा लोककल्याणकारी उद्देश व्यक्त केला. यावेळी त्यांनी ज्यांना दुर्बुद्धी सुचली, त्यांची काय अवस्था झाली, हे सर्वांनी पाहिलं, असा टोला विरोधकांनाही लगावला.

**माऊलींनी आपल्याला शक्ती द्यावी आणि सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी**

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, खरेतर देवाला काही मागावे लागत नाही, कारण त्याला आपल्या मनातील सर्व काही माहित असते, परंतु भक्तांना राहवत नाही. त्यांनी श्री विठ्ठलाला संपूर्ण महाराष्ट्राची काळजी घेण्याकरता माऊलींनी आपल्याला शक्ती द्यावी आणि सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, अशी प्रार्थना केली. विशेषतः, आमच्या बळीराजाला यावर्षी चांगलं पीक व्हावं, त्याच्या जीवनात आनंदाचे चार क्षण यावेत, यासाठी विठ्ठलचरणी साकडे घातल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांचे कल्याण होईल अशा सर्व गोष्टी आपल्या हातून व्हाव्यात, अशीही प्रार्थना त्यांनी केली.

**कोणाचेही नुकसान न करता पंढरपूर कॉरिडॉरवर होणार**

पंढरपूर कॉरिडॉरच्या संदर्भात बोलताना मुख्यमंत्र्यांनी सर्वांना आश्वस्त केले. ते म्हणाले की, कोणाचेही नुकसान न करता, सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हा कॉरिडॉर तयार करण्यात येईल. दुकानदार, घरमालक किंवा कोणताही सामान्य माणूस असो, कोणालाही उद्ध्वस्त केले जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भात अनेकांशी चर्चा केली असून, त्यांच्या शंका दूर केल्या आहेत आणि भविष्यातही या शंका दूर करत कॉरिडॉरचे काम पुढे नेले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**वारी नियोजनात सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा वापर**

यावर्षीच्या वारीच्या नियोजनात मोठ्या सुधारणा झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पाण्याची वाईट अवस्था (उदा. पूरस्थिती) असतानाही सर्व नियोजन अत्यंत चांगले झाल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक वर्षी आधीपेक्षा चांगले करण्याचा प्रयत्न केला जातो, असे त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा प्रशासन, जिल्हाधिकारी, एसपी, कार्यकारी अधिकारी आणि झेडपीचे अधिकारी असे सर्व प्रशासन २४ तास या नियोजनात कार्यरत होते.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वारीमध्ये करण्यात आला आहे. पोलिसांची कमांड अँड कंट्रोल सिस्टीम अत्यंत आधुनिक असून, ड्रोनच्या माध्यमातून भाविकांची अचूक संख्या (हेडकाउंट) प्राप्त होत आहे. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेचा देखील उपयोग केला जात आहे. दरवर्षी वारीमध्ये नवीन तंत्रज्ञान, नवीन व्यवस्था आणि नवीन पद्धती आणण्याचा प्रयत्न राहील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**स्वच्छतेवर भर आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

यंदा स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले गेले असून, पंढरपुरात कुठेही घाण किंवा दुर्गंधी नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हे पाहून अतिशय आनंद झाल्याचे ते म्हणाले. पंढरपूर नगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्यांची क्षमता कमी असल्याने ती वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, पोलीस कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्याबाबतही विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

मंदिर व्यवस्थापन आणि वारीतील राजकारण मंदिराच्या सरकारीकरणाच्या (वास्तविक व्यवस्थापनासाठी कायदा) विरोधात असलेल्या भूमिकेबद्दल विचारले असता, मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, कायदा केला म्हणजे सरकारीकरण केले असे होत नाही, तर हे मंदिराचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे चालावे यासाठी आहे. कायद्यानंतर मंदिरात अनेक सुधारणा झाल्याचे त्यांनी सांगितले. वारीमध्ये कोणालाही येण्याची परवानगी आहे, परंतु पांडुरंगाच्या भक्तीने यावे, कुठलाही स्वतःचा अजेंडा चालवण्यासाठी येऊ नये, असा सल्लाही त्यांनी दिला. मंदिरात राजकारण बाजूला ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# पुणतांब्यात हजारो भाविकांनी घेतले योगीराजांच्या समाधीचे दर्शन



**पुणतांबा (वार्ताहर)–** आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पुणतांबा येथे हजारो भाविकांनी योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

सकाळपासून पुणतांबा येथे योगीराज चांगदेव महाराज मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांची रिघ लागली होती. सध्या गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असल्यामुळे भाविकांनी गंगास्नानाचा लाभ घेऊन दर्शनासाठी सकाळपासूनच रांगा लावल्या होत्या. पुणतांबा येथे आषाढ महिन्यातील कामिका एकादशीच्या दिवशी दरवर्षीप्रमाणे मोठी यात्रा भरते. असे असले तरी काल आषाढी एकादशीच्या दिवशी ज्या भाविकांना पांडूरंगाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही, असे पंचक्रोषीतील भाविक मोठ्या संख्येने श्री क्षेत्र पुणतांबा येथे येऊन योगीराजांच्या समाधीचे दर्शन घेतात.

भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे म्हणून योगीराज चांगदेव महाराज देवस्थानमार्फत आवश्यक सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. देवस्थानचे विश्वस्त महेश मुरुदगण व विश्वस्त मंडळ भाविकांना सर्वतोपरी सहकार्य करत होते. येथील महादेव मंदिर, काशी विश्वेश्वर मंदिर, दत्त मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मुक्ताई ज्ञानपीठातही भाविकांनी मुक्ताई मातेच्या मुर्तीचे दर्शन घेऊन आश्रमाचे महंत रामानंदगिरी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. आषाढी एकादशीनिमित्त चांगदेव महाराज मंदिर परिसरात पानफुले, प्रसाद तसेच श्रीफळ विक्रीची दुकाने थाटण्यात आली होती. अधूनमधून पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली, मात्र गेल्या २० ते २५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण दिसून येत होते.

# संपत्तीचेही विकेंद्रीकरण व्हायला हवे

## गडकरींनी वाढत्या गरिबीवर व्यक्त केली चिंता

**नागपूर–** देशातील गरीब आणि श्रीमंत यांच्यातील वाढत्या दरीबद्दल केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी चिंता व्यक्त केली. हळूहळू देशात गरीब वाढत चालले आहेत आणि काही श्रीमंत लोकांच्या हातात संपत्ती चालली आहे, अशी चिंता नितीन गडकरी व्यक्त केली. अर्थव्यवस्थेचे केंद्रीकरण होता कामा नये. संपत्तीचेही विकेंद्रीकरण व्हायला हवे, अशी भूमिका नितीन गडकरी यांनी मांडली.

नागपूरमध्ये सीए विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. या कार्यक्रमात बोलताना गडकरींनी देशाची अर्थव्यवस्था, संपत्तीचे मोजक्या श्रीमंताकडे होत असलेले केंद्रीकरण या मुद्यांवरही बोट ठेवले. गडकरी म्हणाले, आता लोक हा प्रश्न विचारत आहे की, आपल्या विकासासाठी आर्थिक चिंतनाची गरज आहे. अमेरिकेने उदारमतवादी अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले. पण, ते मॉडेलही अयशस्वी ठरले आहे. आपल्या देशातही ही चर्चा आहे की, आपण काय करायला हवे? आपले उद्दिष्ट हे आहे की, गरिबांची गरिबी दूर करणारा, तरुणांना रोजगार निर्मिती करणारा, देशाची संपत्ती वाढवणारा आर्थिक पर्याय आपल्याला हवा आहे. त्यामुळे साहजिकच नरसिंहराव आणि मनमोहन सिंगजी यांनी उदारमतवादी अर्थव्यवस्थेचं धोरण स्वीकारले. हे स्वीकारले, पण आपल्याला विचार करावा लागेल की, अर्थव्यवस्थेचे केंद्रीकरण होता कामा नये, अशी भूमिका नितीन गडकरी यांनी मांडली. भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल बोलताना नितीन गडकरी म्हणाले, जीडीपीमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील योगदान समान नाहीये. जीडीपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा २२ ते २४ टक्के आहे. सेवा क्षेत्राचा ५२ ते ५४ टक्के, तर कृषि क्षेत्राचा वाटा फक्त १२ टक्के आहे. यात ६५ ते ७० टक्के ग्रामीण लोकसंख्या आहे.

**शेतीची दुर्दशा अधोरेखित**

भारताच्या जीडीपीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा ५२-५४ टक्के, उत्पादन क्षेत्राचा २२-२४ टक्के, तर ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असूनही, तिचे योगदान केवळ १२ टक्क्यांवरच मर्यादित आहे, याकडे गडकरींनी लक्ष वेधले. ही असमानता दूर करणे आपल्या धोरणांचे केंद्रबिंदू असायला हवे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# यंदा पांढऱ्या सोन्याची लागवड ३० टक्क्यांनी घटली

## अवघी १ लाख १० हजार हेक्टरवर लागवड; मका पिकाकडे वाढला कल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नगर जिल्ह्यातील ऊसानंतर खर्चिक व तेवढेच उत्पादन मिळणारे नगदी पीक म्हणून ओळख असणाऱ्या कपाशी (पांढरे सोने) पिकांची लागवड यंदा ३० टक्क्यांपेक्षा अधिक घटली आहे. जिल्ह्यात कपाशीचे १ लाख ५६ हजार सरासरी क्षेत्र असतांना यंदा अवघ्या १ लाख १० हजार हेक्टरवर कपाशीची लागवड होवू शकली आहे. वाढलेला उत्पादन खर्च व त्या तुलनेत घटलेले उत्पादन यामुळे शेतकरी अन्य पिकांकडे वाळले असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान खरीप हंगामातील पिकांचा कालावधी आता जवळपास संपूष्टात आला असून आतापर्यंत जिल्ह्यात खरीपाच्या सरासरी क्षेत्राच्या ७५ टक्क्यांपुढे पेरण्या झालेल्या नाहीत.

नगर जिल्हा रब्बी हंगामाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र, अलिकडच्या काही वर्षात अवकाळी अथवा जून महिन्यांत पावसाचे प्रमाण वाढल्याने खरीप हंगामातील पिकांचे क्षेत्र वाढतांना दिसत आहे. विशेष करून नगर जिल्ह्यात उत्तर आणि दक्षिण भागात मोठ्या प्रमाणात कपाशी लागवड करण्यात येत असे. मात्र, वाढलेला उत्पादन खर्च, बोंड आळीचा वाढता प्रार्दुभाव यासह सहा महिन्यांचा कालावधी यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कपाशी पिकाकडे कल कमी होतांना दिसत आहे. यामुळे यंदा सुरूवातीपासून कपाशीची लागवड घटणार असा कयास कृषी विभागाला होता. जिल्ह्यात दरवर्षी दीड लाखांहून अधिक हेक्टर असणाऱ्या कपाशीची लागवड यंदा १ लाख १० हजार हेक्टरवर थांबवली आहे.

जूनच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात कपाशी लागवड सुरू होते. यंदा कृषी विभागाने १५ च्या दरम्यान कपाशी बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले होते. तसेच १ जूननंतर कपाशी लागवड करण्याच्या सुचना शेतकऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी १ जूनपूर्वीच कपाशी लागवडी केल्या. गेल्या महिनाभरापासून जिल्ह्यातून पाऊस गायब झाला असून यामुळे अनेक ठिकाणी कपाशी तहानली असल्याचे चित्र आहे. यंदा जिल्ह्यात शेतकऱ्यांनी कपाशी ऐवजी मका पिकाला प्राधान्य दिले असल्याने मका पिकाचे जिल्ह्यातील क्षेत्र ६७ हजार हेक्टरपर्यंत पोहचले आहे.

**अशी आहे कपाशीची लागवड (हेक्टर)**

नगर ६५४ (८१.७५ टक्के), पारनेर ९१ (८५ टक्के), श्रीगोंदा २ हजार ४५१ (४७.१३ टक्के), कर्जत १ हजार २४८ (२३ टक्के), जामखेड ९८ (६५.२३ टक्के), शेवगाव ३७ हजार ९७ (७४.१९ टक्के), पाथर्डी २२ हजार २८७ (६७.५४ टक्के), नेवासा २५ हजार ४८७ (८९.१५ टक्के), राहुरी ११ हजार ५२७ (६२.१३ टक्के), संगमनेर १ हजार ४५३ (५३.८१ टक्के), कोपरगाव ४४६ (४१.१३ टक्के), श्रीरामपूर ५ हजार ३७० (७१ टक्के), राहाता १ हजार ३६६ (६३.५३ टक्के).

# नेवाशातील भाजप संघटनात्मक बैठकीत आगामी नगरपंचायत निवडणुकीवर चर्चा



**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी नेवासा शहर मंडलाची संघटनात्मक बैठक शहरात पार पडली. अध्यक्षस्थानी भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव निरंजन डहाळे होते तर भाजपा शहराध्यक्ष मनोज पारखे, अमृता नळकांडे, संजीव शिंदे व राजेंद्र मुथा व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रास्ताविकात शहराध्यक्ष मनोज पारखे म्हणाले की, नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागनिहाय इच्छुक कार्यकर्त्यांनी प्रभागातील समस्यांवर लक्ष ठेवून जनसंपर्क वाढविण्यासाठी काम करावे. सर्व कार्यकर्त्यांसोबत चर्चासत्र घेण्यात आले. यामध्ये विलास बोरुडे, राजेश कडु, राजेंद्र मुथा, संदिप पारखे यांनी प्रभागातील प्रश्न व कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणी मांडल्या.

अध्यक्षीय भाषणात निरंजन डहाळे यांनी डॉ शामा प्रसाद मुखर्जी यांच्या जीवनप्रवास व कार्याची माहिती दिली. नगरपंचायत निवडणुकीत भाजपची सत्ता व नगराध्यक्ष निवडून आणण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना केल्या.

बैठकीस अनंता डहाळे, निखिल जोशी, संतोष चांदणे, प्रसाद लोखंडे, गोपीनाथ माकोणे, रितेश कराळे महेश पारखे, भरत पारधी, आकाश कुसळकर, प्रकाश गरुटे, गणेश सोनवणे, दत्ता लष्करे, रामदास लष्करे, किरण भोसे, तुषार कारंडे, शिवाजी लष्करे, महेश भुसारे, विजय मोरे, अनिल आगळे, निवृत्ती बर्डे मनोज डहाळे, अशोक मारकळी, रोहित पंडुरे, अभिषेक शेजुळ, गोविंद कदम शंकर कोरेकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरुन

### भंडारदरात धो-धो पाऊस

७७५ दलघफू नवीन पाणी जमा झाले आहे.या स्थितीमुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दरम्यान, आढळा धरण भरल्याने नदीमध्ये २७७ क्युसेकने विसर्ग सुरू असल्याने आढळा नदी प्रवाही झाली आहे.

### गोदावरी दुथडी

सहा वाजेपर्यंत मागील २४ तासांत दारणा धरणाच्या पाणलोटात इगतपुरी ९०, घोटी येथे ६१, भावलीला १२९, भाम ९०, वाकी ६१ मिमी पावसाची नोंद झाली. गंगापूर धरणाच्या पाणलोटात आंबोली येथे १६६, त्र्यंबक येथे ७०, कश्यपीला ८०, गौतमीला ७७ मिमी पावसाची नोंद झाली. गंगापूर समूहातील कश्यपी धरणातून ५०० क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. गंगापूर धरणात २४ तासांत अर्धा टीएमसी पाण्याची आवक झाली. गंगापूर धरणातून काल सायंकाळी ५१८६ क्यूसेकने विसर्ग गोदावरीत सुरू होता. काल सकाळी सहा वाजेपर्यंत गंगापूर धरणातून ३.६ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला. काल रविवारी सकाळी सहा ते सायंकाळी ६ या १२ तासांत गंगापूरच्या पाणलोटातील आंबोली येथे १५७ मिमी पावसाची नोंद झाली. त्र्यंबकला ८९, गंगापूरला २३, गौतमीला ६०, कश्यपीला २२ मिमी पावसाची नोंद झाली. १२ तासांत गंगापूर धरणात २७० दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. गंगापूरमध्ये ६०.४२ टक्के पाणी साठा आहे.

पालखेड धरणातूनही ६४६ क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. वरील सर्व धरणांचे पाणी खाली नंदुरमधमेश्वर बंधाऱ्यात दाखल होत असल्याने नंदुरमधमेश्वर बंधाऱ्यातून गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने ३९१७२ क्यूसेकने विसर्ग झेपावत आहे. या विसर्गामुळे गोदावरीचे पात्र तुडूंब भरून वाहत आहे. काल सकाळी सहा वाजेपर्यंत एकूण १८ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

# प्रशासक राजमुळे वित्त आयोगाचा कोट्यवधींचा निधी रखडला

## २०२१-२२ पासून जिल्हा परिषद, पंचायत समित्यांना १ कोटी ३२ लाखांची प्रतिक्षा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागाच्या विकासासाठी १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत केंद्र शासनाकडून ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीस कोट्यवधीचा निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. दरम्यान, २०२२ पासून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीवर प्रशासकराज असल्याने या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्त आयोगाचे अनुदान थकित आहे. एकट्या नगर जिल्हा परिषद व १४ पंचायत समित्यांना या वित्त आयोगातील टाईड आणि अनटाईडमधील १ कोटी ३२ लाख रुपयांची प्रतिक्षा आहे.

नगर जिल्हा परिषद व १४ पंचायत समित्यावर गेल्या साडेतीनहून अधिक वर्षापासून प्रशासक राज आहे. प्रशासक असणाऱ्या संस्था केंद्र सरकारकडून वित्त आयोगाचा निधी दिला जात नाही. यामुळे जिल्हा परिषद पंचायत समित्यांना कोट्यावधी रुपयांच्या विकास निधीला कात्री लागली आहे. परिणामी, कोट्यवधीचा निधी थकित राहिला आहे. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ एप्रिल २०२० पासून केंद्र शासनाकडून बंधित टाईड व अबंधित (अनटाईड) अशा दोन प्रकारात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. बंधित प्रकारात ६० टक्के अनुदान देण्यात येते. त्यातून स्वच्छता आणि पाणंदमुक्त गाव, पाणी पुरवठा, जलपुनर्भरण करणे असे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच अबंधित प्रकारात ४० टक्के अनुदान दिले जाते. हा निधी स्थानिक गरजेनुसार आवश्यक बाबींवर वापरता येतो.

पूर्वी वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषद स्तरावर देण्यात येत होता. मात्र, २०२० पासून हा निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतस्तरावर वेगवेगळा वितरीत करण्यात येत आहे. यात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना प्रत्येकी १० टक्के तर एकट्या ग्रामपंचायतींना ८० टक्के निधीचे वितरण करण्यात येते. ग्रामीण भागाच्या बळकटी करणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात हा निधी मंजूर करण्यात येतो. प्रशासक राज असणाऱ्या संस्थांना मात्र हा निधी उपलब्ध करून दिला जात नाही. यामुळे नगर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांना वित्त आयोगातील निधी अद्याप मिळालेला नाही. नगर जिल्ह्यात तर २०२१ पासून वित्त आयोगाच्या निधीची प्रतिक्षा असून पाच वर्षात हा आकडा १ कोटी ३२ लाख ९६ हजारांपर्यंत पोहचला आहे.

**वर्षनिहाय रखडलेला निधी**

२०२१-२२ मध्ये १५ लाख १४ हजार टाईड आणि १० लाख ९ हजार अनटाईड. २०२२-२३ मध्ये १५ लाख ६९ हजार टाईड आणि १० लाख ४६ हजार अनटाईड. २०२३-२४ मध्ये १५ लाख ६८ हजार २९२ टाईड आणि १० लाख ५७ हजार अनटाईड, २०२४-२५ मध्ये १६ लाख ७९ हजार टाईड आणि ११ लाख १९ हजार अनटाईड, तर २०२५-२६ मध्ये १६ लाख ३८ हजार टाईड आणि १० लाख ९२ हजार अनटाईड अशा प्रकारे १ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी रखडलेला आहे.

**वित्त आयोगातून ही होतात कामे**

पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, पथ दिवे, अंतर्गत रस्ते, आरोग्य सेवा आणि शिक्षण आदी कामे वित्त आयोगातून करण्यात येतात.

# नेवासा फाटा येथील विठ्ठल मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी



**नेवासा फाटा (प्रतिनिधी)–** आषाढी एकादशीनिमित्त नेवासाफाटा येथील मुळा पाटबंधारे वसाहतमधील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरामध्ये भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले.

परिसरातील भाविकांना विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी नेवासे येथे जावे लागत होते. श्रीक्षेत्र देवगड येथील गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर नुकतेच स्थापन करण्यात आले. मुकिंदपूर (नेवासा फाटा परिसरातील भाविकांनी मंदिराची स्थापना केली. मंदिराला विद्युत रोषणाई करून सजविले होते. भगवे झेंडे, पताका व आकर्षक रांगोळीने मंदिर परिसराची सजावट केली होती. सकाळपासूनच महिला, पुरुष, आबालावृद्ध पांडुरंगाच्या दर्शनासाठी मंदिरात येत होते. भाविकांच्या वतीने मंदिरामध्ये फराळ-खिचडीचे वाटप करण्यात आले.